# 6 वा महाराष्ट्र राज्य वित्त आयोग, वित्त विभाग, मुंबई.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 243 अंतर्गत महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आलेली असून आयोगाच्या कामासाठी सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

**विभागाची आवश्यकता :**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 243 म व 243 झ च्या तसेच महाराष्ट्र वित्त आयोग (संकिर्ण तरतूद) अधिनियम, 1944 व सन 1995 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.15 व सन 2000 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.11 नुसारच्या तरतुदीस अनुसरुन दि.27.3.2025 च्या अधिसूचनेनुसार 6 व्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आलेली असून आयोगासाठी शासन निर्णय वित्त विभाग क्र.सविआ 0225/प्र.क्र.27/विआक, दि.14.5.2025 अन्वये खालील पदे निर्माण करण्यास तसेच ही पदे नियमितपणे भरणे शक्य नसल्यास आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांमधून अथवा बाहयस्त्रोताद्वारे अथवा समकक्ष संवर्गातून मुंबई येथे करार पध्दतीने भरावयाची आहेत.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी | पदसंख्या | आवश्यक पात्रता /अर्हता |
|---|---|---|---|
| 1. | उप सचिव<br>पात्र उप सचिव उपलब्ध न झाल्यास अवर सचिव | 1 | 1) मंत्रालयातील उप सचिव/अवर सचिव<br>नगर विकास विभाग/ ग्राम विकास विभाग /वित्त विभाग यातील आस्थापना, योजना, अर्थ वित्त आयोग या संबधीत कामकाजाचा 3 वर्षाचा अनुभव.<br>2) संगणक वापराचे ज्ञान आवश्यक. |
| 2. | उप आयुक्त (महानगरपालिका)<br>सदर पात्र अधिकारी उपलब्ध न झाल्यास सहायक आयुक्त (महानगरपालिका) | 1 | 1) नगर विकास विभागात आस्थापना/योजना/वित्त विषयक बाबीमधील नगर विकास विभागातंर्गत क्षेत्रीय कार्यालयातील कामकाजाचा 3 ते 5 वर्षाचा अनुभव.<br>2) संगणक वापराचे ज्ञान आवश्यक. |
| | **एकूण पदे** | 2 | |

अटी व शर्ती :-

1) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांची नियुक्ती आयोगाचा अहवाल सादर करेपर्यंत किवा दि.31 मार्च 2026 पर्यत, यापैकी जे आधी घडेल, तोपर्यंत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.सीबीई-1525/प्र.क्र.37/आस्थामं (का.13), दि.10.6.2025 च्या तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.
2) विभागास आवश्यक असलेली अर्हता धारण करणा-या मागील दोन वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना प्राधान्य देण्यात येईल.
3) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.
4) उमेदवाराचे वय 65 वर्षापेक्षा अधिक नसावे.
5) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्हयात राहणारा असावा.
6) आवश्यक अर्हता धारण करणा-या इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांनी/कर्मचाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.
7) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज दि.12.8.2025 पर्यंत मा.सदस्य सचिव, सहावा महाराष्ट्र वित्त आयोग, 2 रा मजला, अेपीजे हाऊस, के.सी.कॉलेज जवळ, चर्चगेट, मुंबई 400 020 या पत्त्यावर पोहोचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.
8) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.
9) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबत संपूर्ण अधिकार आयोगाला राहील.
10) पात्र उमेदवारांची मुलाखत अर्जाच्या शेवटच्या दिवसानंतर तात्काळ घेण्यात येईल. याबद्दल भ्रमणध्वनीवरुन सूचना देण्यात येईल.
11) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिका-यांस/कर्मचा-यांस वित्त आयोग, मुंबई येथे काम करावे लागेल.

## अर्जाचा नमुना

करार पध्दतीने सेवानिवृत्त झालेल्यामधून भरावयाच्या 1) उप सचिव पात्र उप सचिव उपलब्ध न झाल्यास अवर सचिव 2)उप आयुक्त (महानगरपालिका) सदर पात्र अधिकारी उपलब्ध न झाल्यास सहाय्यक आयुक्त (महानगरपालिका) पदासाठी अर्ज :

कार्यालयाने करावयाची कार्यवाही

अर्ज प्राप्त दिनांक :
अर्ज क्रमांक :
आवक क्रमांक :

---

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | अर्जदाराचे नांव | :- | |
| 2. | पत्रव्यवहाराचा पत्ता (कायमचा) | :- | |
| 3. | दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | :- | |
| 4. | ई मेल आयडी | :- | |
| 5. | जन्म तारीख व वय वर्षे | :- | |
| 6. | सेवानिवृत्तीचा दिनांक | :- | |
| 7. | अर्ज सादर करतेवेळी वय | :- | |
| 8. | शैक्षणिक अर्हता | :- | |
| 9. | सेवानिवृत्त झालेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता | :- | |
| 10. | सेवानिवृत्त झालेल्या पदाचे नांव | :- | |
| 11. | सेवानिवृत्तीच्या दिवशी अंतिम वेतन | :- | |
| 12. | सध्या मिळणारे निवृत्ती वेतन ( मंजूर झाल्याप्रमाणे 6 वा /7 वा वेतन आयोगानुसार लागू असलेले) | :- | |
| 13. | एकूण शासकीय सेवा कालावधी व त्याबाबतचा तपशिल | :- | |
| 14. | सोपविण्यात येणा-या कामाबाबतचा तीन वर्षाचा अनुभव आहे का? असल्यास त्याबाबतचा तपशिल | :- | होय/नाही |
| 15. | शासकिय सेवेत असताना कधी विभागीय चौकशी झाली का ?<br>झाली असल्यास त्याबाबतचा तपशिल (विभागीय चौकशी/शिक्षा झाली असल्यास) | :- | होय/नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| 16. | सेवानिवृत्त झालेल्या कार्यालयातून अंतिम विभागीय चौकशी सुरु आहे का? याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र जोडले आहे का? | :- | होय/नाही |
| 17. | शारिरीक/मानसिक वा आरोग्यच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबतचे डॉक्टरांचा दाखला जोडला आहे का? | :- | होय/नाही |
| 18. | सेवानिवृत्तीच्या वेतनाच्या प्रदान आदेशाची प्रत PPO जोडली आहे का? | :- | होय/नाही |
| 19. | संगणक हाताळणी बाबतचे ज्ञान आहे का? असल्यास तपशिल | :- | होय/नाही |

उपरोक्त अर्जात नमूद केलेली माहिती सत्य असून त्यात कोणतीही माहिती खोटी नाही. विवक्षित प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी करार पध्दतीने जाहीरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

अर्जदाराची सही व नाव

सोबत :- 1)

2)

3)

| अर्जाच्या छाननीबाबतचा तपशिल | सदस्य सचिव | सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य |
|---|---|---|---|---|---|
| अर्ज तपासणी/छाननी करणा-या अधिका-यांची सही व दिनांक : | | | | | |
| अर्ज पात्र /अपात्र : | | | | | |
| अभिप्राय : | | | | | |